पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर (अभिलेख शाखा)

दूरध्वनी क्रमांक - 0231-2662433

E.mail- sp.kolhapur@mahapolice.gov.in

क्र. १६-आरके/अर्ज शाखा/सॉफ्टवेअर तयार करणे/दरपत्रके सूचना/२०२५ कोल्हापूर दि. २३/०१/२०२५

## - दरपत्रक सूचना -

कोल्हापूर पोलीस दल येथे जनतेकडून व वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त होणारे तक्रारी अर्ज हे ऑनलाईन पध्दतीने स्विकारणे व चौकशी करुन त्याची निर्गती करणेसाठी या घटकात सन २०१९ मध्ये सुविधा पोर्टल तयार करण्यात येऊन कार्यान्वित केले आहे. सदर तयार करण्यात आलेले सुविधा पोर्टल हे सन २०१९ ते २०२४ या ०५ वर्ष कालावधीसाठी तयार करण्यात आले असून त्यास पुरविण्यात आलेल्या टेक्नॉलॉजीचा कालावधी समाप्त झाला आहे.

तरी, कोल्हापूर पोलीस दल येथे वरील प्रमाणे नव्याने सॉफ्टवेअर तयार करण्यात येऊन डेव्हलपमेंट करण्यासाठी या कार्यालयामधील अर्ज शाखा येथे संबधित सॉफ्टवेअर डेव्हलपर/पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक डेव्हलपर/पुरवठादार यांनी दिनांक २४/०१/२०२५ ते ३१/०१/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत पोलीस अधीक्षक, कोल्हापूर कार्यालयातील अर्ज शाखा येथे सध्या कार्यान्वित असलेल्या सुविधा सॉफ्टवेअरची प्रत्यक्ष हजर राहून माहिती घेणे बंधनकारक राहिल. तसेच नव्याने सॉफ्टवेअर तयार करण्यासाठी आवश्यक मागणी ( Requirement) ची माहिती अर्ज शाखा येथे घेवून वरील नमूद दिनांकापर्यंत दरपत्रके या कार्यालयातील अर्ज शाखा येथे समक्ष सादर करावीत. नमूद विहित वेळेनंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत. तसेच प्राप्त झालेली दरपत्रके पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर येथे उघडण्यात येवून नियमानुसार ती स्वीकरणे अगर नाकारणे याबाबत मा.पोलीस अधीक्षक, कोल्हापूर हे अंतिम निर्णय घेतील व तो सर्वांना बंधनकारक राहील.

पोलीस अधीक्षक
यांचे मान्यतेने

( सुवर्णा पत्की )
प्रभारी पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक कार्यालय कोल्हापूर